# दुचाकीवरून जात असलेल्या शिक्षिकेच्या गळ्यातील साडेतीन तोळ्यांचे गंठण ओरबाडले

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी शहरातील न्यायालय परिसरात काल दि. २० एप्रिल रोजी रात्रीच्या दरम्यान पाठीमागून दुचाकीवर आलेल्या एका भामट्याने दुचाकीवरून जात असलेल्या शिक्षक महिलेच्या गळ्यातील सुमारे साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण हिसकावून धूमस्टाईलने चोरी केल्याची घटना घडली.

छाया अरविंद शिंदे (वय ४३) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका असून त्या शहरातील वृंदावननगर येथे राहतात. दि. २० एप्रिल रोजी रात्रीच्या वेळी छाया शिंदे व त्यांचे पती अरविंद शिंदे हे दोघे शुभकिर्ती लॉन्स येथे लग्न कार्याकरीता गेले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर रात्री ९.१५ वाजे दरम्यान शिंदे पती-पत्नी त्यांच्या दुचाकीवर घराकडे जात होते. दरम्यान न्यायालय परिसरातील सुर्या क्लासेस जवळ पाठीमागुन मोटारसायकलवर हेल्मेट घालून आलेल्या एका भामट्याने छाया शिंदे यांच्या गळ्यातील १ लाख ६५ हजार रुपये किंमतीचे ३ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण ओरबाडून धूमस्टाईलने चोरी केली. त्यावेळी शिंदे यांनी आरडाओरडा केला, मात्र भामटा काही क्षणात घटनास्थळावरून पसार झाला.

याप्रकरणी छाया अरविंद शिंदे या शिक्षक महिलेच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात भारतीय न्याय संहीता कलम ३०९ (४) प्रमाणे रस्तालूटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरातील महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा घटना शहरात नित्याच्या झाल्याने महिलांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप परदेशी हे करीत आहे.

# जानकर, राजू शेट्टी, बच्चू कडू एकत्रित काम करणार

**पुणे (प्रतिनिधी)–** आम्हाला राजकारणात उजव्या बाजूला का उभे राहावे लागले, याचे कारण काँग्रेस आम्हाला महत्त्व देत नव्हती. त्यांना वाटायचे की, दगड उभा केला तरी तो निवडून आणू. काँग्रेसवाल्यांना मस्ती चढली होती. त्यांचे २ टक्के मतदार फिरवून काँग्रेस आणि शरद पवारांना हरवण्यासाठी आणि त्यांना सत्तेतून बाहेर काढण्यासाठीच आम्ही भाजपसोबत गेलो, असे प्रतिपादन राष्ट्रीय समाज पक्षाचे (रासप) संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी केले.
दरम्यान, आत्मविश्वास गमावलेल्या समाजाला पुन्हा फुंकर देण्यासाठी राजू शेट्टी, बच्चू कडू आणि मी एकत्रित काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय समाज पक्षाच्यावतीने गंजपेठ येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित युवा संघर्ष निर्धार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रहार संघटनेचे अध्यक्ष, माजी राज्यमंत्री बच्चू कडू उपस्थित होते. या कार्यक्रमात अनिल पवार, विक्रम ढोणे, दत्तकुमार खंडागळे, सौरभ हटकर, नितीन आंधळे यांचा युवा संघर्ष योद्धा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

जानकर म्हणाले, राजकारण आणि चळवळ यात खूप फरक असतो. चळवळ नेहमी शेतकरी आणि उपेक्षितांच्या बाजूने उभी राहते. मात्र, आम्हाला राजकारणात उजव्या बाजूला का उभे राहावे लागले. भाजप आणि काँग्रेसने चमच्यांची फौज जमा करण्याचे काम केले. मी चमचा म्हणून कोणत्याही पक्षाचा झेंडा हाती घेतला नाही. तसे केले असते तर मी केंद्रीय मंत्री झालो असतो. स्वतःचा पक्ष काढीन आणि पक्षाच्या चिन्हावर पंतप्रधान होईन, घरी जाणार नाही आणि संसार उभा करणार नाही, तर देशाचा संसार उभा करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे मी १९९३ मध्ये सांगितले होते.

सामाजिक आणि जातीय संघटना चालवणे सोपे असते. पण, पक्ष चालवणे कठीण आहे. जात म्हटले की, लोक लगेच एकत्र येतात. सर्व जातींना सोबत घेऊन जाणारा पक्षच पुढे जातो. रासपने ४ राज्यांमध्ये चांगले यश मिळवले आहे आणि आणखी २ राज्यांमध्ये चांगले यश मिळवून रासप हा काँग्रेसपेक्षा मोठा पक्ष होईल. दिल्लीत ३१ मे रोजी अडीच कोटी रुपये खर्च करून पक्षाचे कार्यालय सुरू करणार असल्याचेही जानकर यांनी यावेळी सांगितले. बहुजन वर्गाचे प्रश्न मोठे आहेत. त्यावर सातत्याने आवाज उठवला गेला पाहिजे. हे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय सत्तेची गरज आहे. सत्तेच्या चाव्या बहुजन समाजाच्या हातात येण्यासाठी कायम संघर्ष करत राहू, असा निर्धार राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष आणि माजी मंत्री महादेव जानकर यांनी व्यक्त केला.

**राजकीय सत्ता ही महत्वाची आहे**

जानकर म्हणाले, आमची राजकीय लढाई ही शोषित बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आहे. त्यासाठी राजकीय सत्ता ही महत्वाची आहे. मी, राजू शेट्टी आणि बच्चू कडू यांनी २००९ मध्ये रिडालोसचा प्रयोग केला होता. पुढील काळात २०१४ च्या निवडणुकांपुर्वी गोपीनाथ मुंडे साहेबांनी छोट्या पक्षांचे महत्व ओळखून आम्हाल जवळ केले. छोट्या पक्षांच्या सहकार्यामुळेच २०१४ ला सत्तापरिवर्तन झाले. त्यानंतरच्या काळात आम्हाला काही काळ सत्तेत काम करण्याची संधी मिळाली. माझ्याकडे पशुसंवर्धन मंत्री असताना राज्यातील सर्वाधिक दूध दर मी दिला होता. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या विचारांचे आमदार मोठ्या संख्येने विधीमंडळात गेले पाहिजेत. त्यादृष्टीने आगामी काळात संघर्ष करत राहू.

बच्चू कडू म्हणाले, महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकऱ्यांचे मोठे प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, मात्र त्याकडे सरकारचे लक्ष नाही. जातीजातींत भांडणे लावण्याचे काम केले जात आहे. हा कावा सामान्य लोकांनी ओळखला पाहिजे. आम्हाला जरी सत्तेत सहभागी होता आले नाही तर सत्ता सर्वसामान्यांच्या दारात नेण्यासाठी आमचे प्रयत्न राहतील.

# जलजीवन योजनेतील भ्रष्टाचारात भगिनींचे बळी- सपकाळ

**मुंबई (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठा गाजावाजा करून जलजीवन मिशनद्वारे २०२४ पर्यंत देशातील प्रत्येक घरात नळाद्वारे स्वच्छ पिण्याचे पाणी मिळेल, असे सांगितले होते. मात्र २०२५ उजाडले तरी महाराष्ट्र तहानलेलाच आहे. हंडाभर पाण्यासाठी माता भगिनींना पायपीट आणि संघर्ष करावा लागत आहे. या योजनेतील भ्रष्टाचार माता भगिनींचे बळी घेत आहे, असे टीकास्त्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी येथे सोडले.

राज्यातील पाणीटंचाईच्या मुद्द्यावरून सपकाळ यांनी आज पत्रकार परिहासदेत केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला अशी सरकारची स्थिती आहे. घोषणा मोठमोठ्या होतात मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही. हर घर नल आणि हर नल जल असे नरेंद्र मोदी सातत्याने सांगत होते. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने जलजीवन मिशन योजना सुरु केली. पण केंद्रीय अर्थ मंत्रालयानेच भ्रष्टाचार झाल्याचे मान्य करून एका नळाचा खर्च ३० हजारावरून १ लाख ३७ हजारांवर कसा गेला याचे स्पष्टीकरण मागवल्याची माहिती सपकाळ यांनी दिली.

जलजीवन मिशन योजनेचा फायदा फक्त अधिकारी आणि कंत्राटदारांनाच झाला आहे. माता भगिनींना पाण्यासाठी संघर्षच करावा लागतो आहे. यवतमाळ जिल्ह्यातील एक मुलगी पाणी आणण्यासाठी जात असताना तिचा मृत्यू झाला. नाशिक जिल्ह्यातील महिलांना हंडाभर पाण्यासाठी जीव धोक्यात घालून विहिरीत उतरावे लागते यावरून जलजीवन मिशन भ्रष्टाचाराची बळी ठरली आहे. आता तर केंद्र सरकारने या योजनेच्या निधीत ४७ टक्के कपात केली आहे. त्यामुळे निधीअभावी कामे होणार नाहीत. परिणामी महिलांची पाण्यासाठीची वणवण पुढची काही वर्ष सुरुच राहणार आहे, असे ससपकाळ म्हणाले.

**पोलिसांनी माधव भांडारींची चौकशी करावी**

मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्या प्रकरणी भाजप प्रवक्ते माधव भंडारी यांनी केलेल्या वक्तव्याचा सपकाळ यांनी यावेळी निषेध केला. या प्रकरणातला आरोपी डेव्हिड कोलमन हेडली अद्याप फरार आहे. तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण करून त्याला मुंबईत आणले आहे. त्यामुळे माधव भांडारींना ताब्यात घेऊन त्यांचीही राणासोबत चौकशी करावी. कारण त्यांनी केलेले वक्तव्य गंभीर आहे. त्यांच्या वक्तव्यानुसार त्यावेळी सरकारमध्ये असलेले अनेक नेते आज भाजपमध्ये आहेत. अजित पवारांसह अनेकजण त्यावेळीही मंत्रिमंडळात होते आणि आताही मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळे अजित पवारांना मंत्रीपदावरून बरखास्त करून त्यांचीही चौकशी करावी. यानिमित्ताने कायम राष्ट्रहिताच्या गप्पा मारणाऱ्या भाजपचे नेते किती खरे बोलतात ते समोर येईल, असा टोला सपकाळ यांनी लगावला.

दरम्यान, माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस सोडण्याचा घेतलेला निर्णय आत्मघातकी आहे. थोपटे यांचे नाव विधानसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेस पक्षाने निश्चित केले होते. पण देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळी विधानसभा ध्यक्षपदाची निवडणूक होऊ दिली नाही. त्यामुळे त्यांची संधी हुकली होती. त्यामुळे ज्यांनी विश्वासघात केला, थोपटे त्यांच्याकडेच जात आहेत, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# अजिंक्य रहाणे एकटाच लढला अन् गुजरातने सामना सहज जिंकला

**कोलकाता–** अजिंक्य रहाणे गुजरातच्या संघासमोर एकटाच लढला आणि त्यामुळेच गुजरातला केकेआरवर मोठा विजय साकारता आला. केकेआरवर यावेळी घरच्याच मैदानात लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. शुभमन गिलच्या धडाकेबाज ९० धावांच्या जोरावर गुजरातने प्रथम फलंदाजी करताना १९८ धावा केल्या होत्या. केकेआरचा संघ विजयाचे आव्हान पूर्ण करण्यासाठी उतरला खरा, पण केकेआरच्या फलंदाजांनी अजिंक्य रहाणेला एकटे पाडले. अजिंक्यने अर्धशतक झळकावले खरे, पण त्यानंतर तो एकही धाव करू शकला नाही. अजिंक्य बाद झाला आणि त्यानंतर केकेआरने हाराकिरी पत्करली. त्यामुळेच गुजरातने ३९ धावांनी दमदार विजय साकारला.




केकेआरला विजयाचे १९९ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरला खरा, पण अजिंक्य रहाणे यावेळी एकटाच पडल्याचे पाहायला मिळाले. कारण सलामीवीर गुरबाझ, सुनील नरिन आणि वेंकटेश अय्यर हे स्वस्तात बाद झाले. पण अजिंक्य यावेळी चांगली लढत देत होता. अजिंक्यने यावेळी अर्धशतक झळकावले खरे, पण त्यानंतर तो लगेच बाद झाला. अजिंक्यने पाच चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५० धावांची खेळी साकारली. त्यानंतर केकेआरच्या विजयाची आशा रिंकू सिंग आणि आंद्रे रसेल यांच्यावर होती. पण हे दोघेही अपयशी ठरले आणि गुजरातने सामना जिंकला.

गुजरातच्या दोन्ही सलामीवीरांनी केकेआरच्या गोलंदाजीचा पालापाचोळाच करुन टाकला. साई सुदर्शन आणि शुभमन गिल या दोघांनी अशी काही गुजरातला सुरुवात करून दिली की, सर्व संघाला अशी सलामी मिळवण्याची आशा असते. या दोघांची केकेआरच्या गोलंदाजीचा यथेच्छ समाचार घेतला. या दोघांनी मिळून १३ व्या षटकात ११४ धावांची दणकेबाज सलामी यावेळी दिली. साई सुदर्शनने यावेळी सहा चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५२ धावांची खेळी साकारली. साई बाद झाला असला तरी शुभमन गिल मात्र खेळपट्टीवर दमदार फलंदाजी करत होता. गिलने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि तो शतकाच्या दिशेने कूच करायला लागला.

गिल यावेळी नव्वदीमध्ये आला आणि तो आता शतक झळकावेल, असे सर्वांनाच वाटत होते. पण एका मोठ्या फटक्याने त्याचा घात केला. गिलने यावेळी ५५ चेंडूत १० चौकार आणि तीन षटाकरांच्या जोरावर ९० धावांची धमाकेदार खेळी साकारली. गिल बाद झाला तरी जोस बटलर हा खेळत होता. बटलरने वेळी आक्रमक ४१ धावांची खेळी साकारली, त्यामुळेच गुजरात १९८ धावांचा पल्ला गाठता आला.

# नाशिक बाह्यवळण रस्ते प्रकल्पाला गती; प्रस्ताव सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** सन २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक परिसरात वाढणारी रहदारी, साधू-संत-महंत आणि भाविकांची होणारी गर्दी याचा विचार करुन योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक बाह्यवळण प्रकल्पाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी तातडीने सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे दिले. तसेच नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्तावही तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मंत्रालयात आयोजित बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिक बाह्यवळण रस्त्याच्या कामांचा आढावा घेतला. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बाह्यवळण रस्त्यांतर्गत येणाऱ्या मार्गांची कामे प्राधान्याने हाती घेण्याचे निर्देश देऊन फडणवीस म्हणाले, नाशिक विभागीय आयुक्त आणि नाशिकचे पालक सचिव यांनी प्राधान्याने सुरु करावयाच्या रस्त्यांचा आराखडा येत्या १० दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करावा. बाह्यवळण मार्ग, परिक्रमा मार्ग यांच्याबरोबरच अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे तातडीने सुरु करावीत. विमानतळ, समृद्धी महामार्ग यांना जोडणाऱ्या मार्गांची कामे युद्धपातळीवर सुरु करा. तसेच शहरातील आवश्यक रस्त्यांची कामे देखील महापालिकेमार्फत नगर नियोजन अंतर्गत घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गाने भाविक येण्याची शक्यता आहे. त्या मार्गातील रस्त्यांचे बळकटीकरण करण्यासह त्या रस्त्यांवर वाहनतळांची सुविधा निर्माण करावी. नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्ताव तयार करा. नाशिकमधील रहदारीचे योग्य नियोजन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करा, असे निर्देश फडणवीस यांनी यावेळी दिले.

देशातील शहरांना विकास केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यासाठी शहरांचा सर्जनशील पुनर्विकास, शहरांच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छतेच्या प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने शहरी आव्हान निधीफ स्थापन केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या शहरी आव्हान निधीफ कार्यक्रमांतर्गत नाशिक शहरातील वाहतूक समस्येचा समावेश करून नागरिकांचा प्रवास सुखकर करण्याच्या सूचनाही फडणवीस यांनी दिल्या.

## पान १ वरुन

### ऊस, कांदा, मका, कापूस, सोयाबीन, भात उत्पन्न वाढीसाठी 'एआय'चा वापर होणार

आपल्यासोबतच इतर काही संस्थानीही टायअप केलं आहे. राज्यातील जेवढी कृषी विद्यापीठे आणि काही खाजगी कंपन्याही यात उतरल्या आहेत. शेतकऱ्याला हे सर्व देत असताना पैसे कसे उपलब्ध होणार, याबाबत आम्ही गेल्या दिड तासात चर्चा केली.

आमच्या शेती विभागानेही महाराष्ट्र सरकारकडून प्रेझेंटेशन दिले. इतर कंपन्यांनीही प्रेझेंटेशन दिले. त्यांनी केलेल्या प्रयोगांमधून उसाचे उत्पन्न कसे वाढले हे त्यांच्या प्रेझेंटेशन मधून दाखवले. आज पीएम ऑफिसमध्येही यासंदर्भात मिटींग होणार आहे. आपले कृषी मंत्री दखील या मिटींगला उपस्थित राहणार आहेत. जुनमध्ये खरीप हंगाम सुरू होईल, त्यापूर्वी काम पूर्ण होण्यासाठी आमचा प्रयत्न असणार आहे.

**कोणी कुठे जायचे हा त्यांचा प्रश्न**

भोर-मुळशी मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी आपल्या पक्षाचा राजीनामा दिला आहे. ते आज (मंगळवारी) भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे भोर मुळशीमध्ये भाजपचा शिरकाव होणार आहे. येथे विद्यमान आमदार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे शंकर मांडेकर हे आहेत. त्यामुळे थोपटेंच्या भाजप प्रवेशाविषयी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी ममग मी काय करूफ, असे म्हणत विषय संपवला.

अजित पवार म्हणाले, ते एका राजकीय पक्षाचे आमदार होते. ते आता पराभूत झाले आहेत. आता त्यांनी काय करावे हा त्यांचा अधिकार आहे. त्यावर मी कमेंट करण्याची काहीच कारण नाही.

**बाकीच्यांनी फार काही चर्चा करण्याची गरज नाही**

१५ दिवसांत शरद पवारांसोबत तिसऱ्यांदा भेट झाल्याबद्दल अजित पवारांना विचारले असता ते म्हणाले, माझ्या मुलाच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमात आम्ही परिवार म्हणून एकत्र आलो होतो. ती महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आहे ती वर्षानुवर्ष चालत आली आहे. त्याबाबत बाकीच्यांनी फार काही चर्चा करण्याची गरज नाही. तो पवार परिवाराचा अंतर्गत प्रश्न आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

दुसरा म्हणजे पवारसाहेब हे ज्या रयत संस्थेचे अध्यक्ष आहे तेथे मी सदस्य, ट्रस्टी म्हणून काम करतो. तेथे मी उपमुख्यमंत्री म्हणून जात नाही मी सदस्य म्हणून जातो.फ्तरही पक्षाचे नेते यामध्ये सदस्य आहेत. या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी या बैठकीला उपस्थित राहिलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही बैठक पण एआय बाबत होती. ज्यातून शेतकरी वर्गाला फायदा होतील अशा गोष्टी आहेत. त्या केल्या पाहिजेत, अशा वेळी एकत्रित बसावे लागत आहे, सगळे इतर नेते पण बसतात, काही विषय राजकारणा पलीकडे बघायचे असतात, निवडणुका झाल्या आहेत, जनतेच्या काही अपेक्षा आहेत. माहिती, विचार देवाणघेवाण करणे, सुसंस्कृत महाराष्ट्र म्हणून एकत्र आलो असल्याचे त्यांनी सांगितले.

**२६/११ घडलं त्यावेळेसच्या मुख्यमंत्र्यांची, गृहमंत्र्यांची ती जबाबदारी होती**

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या आतंकवादी हल्ल्याबाबत भाजप नेते माधव भांडारी यांनी तत्कालीन सरकारमधील असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचा २६/११ च्या हल्ल्यामध्ये वाटा होता, असा आरोप केला आहे. याबाबत अजित पवार यांना विचारला असता अजित पवार म्हणाले, या प्रकरणांमध्ये चौकशी करावी आज केंद्रामध्ये आपले सरकार आहे, तसंच राज्य सरकारमध्ये देखील आपलं सरकार आहे. पोलीस यंत्रणा देखील आपल्या ताब्यात आहे. त्यामुळे याची चौकशी करावी आणि यामध्ये जो दोशी असेल त्याच्यावरती कारवाई करण्यात येईल. ज्यावेळेस २६/११ घडलं त्यावेळेसच्या मुख्यमंत्र्यांची, गृहमंत्र्यांची ती जबाबदारी होती. त्यांनी ती उत्तरं द्यायला हवी, अजित पवार गृहमंत्री नव्हते. मी बोलल्याचा अर्थ कोणी काय काढायचा ते ज्याने त्यांनी ठरवावे, असंही अजित पवार म्हणाले.

### नॉर्दन ब्रँच कालव्यावरील अतिक्रमण काढणार

ना. विखे पाटील पुढे म्हणाले की, तालुक्यातील कालव्यांच्या सर्व चाऱ्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. लाख कालव्यांच्या कामांसाठी साडेसहा कोटी मंजूर करण्यात आले आहेत. नॉर्दन कालव्यावरील अतिक्रमण काढून स्वच्छता करण्यात येणार आहे. कालव्यावरील अतिक्रमण काढून कालव्याचा काही भाग बंदिस्त करून हरित करण्यात येईल. श्रीरामपूर शहर अतिक्रमणमुक्त करून शहराचे सुयोग्य नियोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या काळात स्थानिक तरुणांना रोजगार संधी निर्माण करण्यासाठी निर्णय घेण्यात येतील. निळवंडे व भंडारदरा धरणातील कालव्यातून शेतीला शाश्वत पाणी देण्यासाठी काम करण्यात येईल. अधिक क्षेत्राला पाणी देण्यासाठी जलसंपदा विभाग तत्परतेने काम करत आहे, असेही ना. विखे पाटील यांनी सांगितले. यावेळी हेरंब आवटी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमापूर्वी पालकमंत्र्यांनी कालव्याची पाहणी केली.

### कर्जत नगराध्यक्षांचा नाट्यमय राजीनामा

तब्बल १५ नगरसेवक विजयी केले होते. भाजपला अवघ्या दोन जागा मिळाल्या होत्या. यानंतर पवार यांनी राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) उषा राऊत यांची नगराध्यक्षपदी, काँग्रेसच्या रोहिणी घुले यांची उपनगराध्यक्षपदी निवड केली. उषा राऊत यांना अडीच वर्ष नगराध्यक्षपद व रोहिणी घुले यांना दीड वर्ष उपनगराध्यक्षपद असे समीकरण ठरले होते. अडीच वर्षाची मुदत संपल्यानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि महायुती सरकारने राज्यातील सर्व नगरपंचायत व नगरपालिकांमध्ये विद्यमान नगराध्यक्षांना मुदतवाढ जाहीर केली. त्यानंतर उपनगराध्यक्ष घुले यांनी राजीनामा दिला नाही. मात्र, राऊत यांनी दोन्ही पदांचे राजीनामे एकत्रित घ्या अशी मागणी केली. मात्र, ती नगरसेवकांना योग्य वाटली नाही त्यामुळे १३ नगरसेवक ६ एप्रिलला सहलीला निघून गेले. ७ एप्रिलला त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे राऊत यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला. १६ एप्रिलला या अविश्वास प्रस्तावावर प्रांताधिकाऱ्यांनी सुनावणी ठेवली होती. मात्र ती रद्द करण्यात आली. त्याचदिवशी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नगरसेवकांमध्ये बहुमत असल्यास तेच नगराध्यक्षांना पदावरून दूर करू शकतात असा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे त्याचदिवशी राज्यपालांच्या सहीचा अध्यादेशही राज्यामध्ये लागू करण्यात आला. या राजकीय नाट्यानंतर सोमवारी होणाऱ्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले होते, परंतू राऊत यांनी राजीनामा दिल्यानंतर सभा रद्द झाल्याने आता नवीन नगराध्यक्ष कोण होणार? याकडे मतदारसंघासह राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेतेपदी संतोष मेहत्रे व अमृत काळदाते, तर उपगटनेतेपदी सतीश पाटील आणि प्रतिभा भैलूमे या सर्वांनी दावा केला असून अधिकृत गटनेते कोण? असा प्रश्न कायम आहे. यामुळे कोणाचा व्हिप अधिकृत मानला जाणार याविषयी चर्चा सुरू आहे.

मेहत्रे म्हणाले, अद्यापही कोण नगराध्यक्ष होणार हे ठरलेले नाही. राम शिंदे याबाबत निर्णय घेणार आहेत. फुटलेले नगरसेवक भाजप सोबत जाणार का? अशी विचारणा केली असता मेहेत्रे म्हणाले, कर्जत शहरातील जनतेचा विचार करून निर्णय घेण्यात येईल. उपनगराध्यक्ष रोहिणी घुले या दोन दिवसांत राजीनामा देतील असेही ते म्हणाले.

**सभापती शिंदेंकडून सत्तेचा गैरवापर**

माझ्या विरोधात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी पैसा व सत्तेचा गैरवापर केला. मी एक ओबीसी नगराध्यक्ष असताना देखील मला पदावरून काढण्यासाठी राम शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये संपूर्ण राज्यासाठी नवीन कायदा केला आणि एका ओबीसी नगराध्यक्षांचा राजकीय बळी घेतला आहे, अशी टीका नगराध्यक्ष उषा राऊत यांनी केली.

### ४८ पोलीस नाईक झाले हवालदार

अदिनाथ मुळे (अहिल्यानगर तालुका), अनिता मरभर (तोफखाना), संजय माने (नेवासा), कृष्णा कुऱ्हे (शिर्डी), सतीष काटे (कोपरगाव शहर), ज्ञानेश्वर सोनवणे (पोलीस मुख्यालय), राहुल सोळुंके (एलसीबी), संध्या म्हस्के (तोफखाना), धर्मराज दहिफळे (अहिल्यानगर तालुका), किशोर लाड (अहिल्यानगर तालुका), सचिन धनाड (शिर्डी), अंकुश बोडखे (नियंत्रण कक्ष), संजय डाळींबकर (पोलीस मुख्यालय), अण्णा पवार (पाथर्डी), महेश पालवे (मोटार परिवहन विभाग), सोमिनाथ बांगर (पाथर्डी), अरविंद भिंगारदिवे (पाथर्डी), रामनाथ सानप (राहुरी), चांगदेव आंधळे (तोफखाना), अरूण गांगर्डे (नेवासा), बाबासाहेब सातपुते (पोलीस मुख्यालय), संदीप पांडे (पोलीस मुख्यालय), अजित घुले (अकोले), गुलाब मोरे (श्रीगोंदा), बापुराव देशमुख (पोलीस मुख्यालय), संदीप धामणे (खर्डा), संतोष खैरे (सायबर), रवींद्र कर्डिले (साई मंदिर सुरक्षा, शिर्डी), प्रवीण अंधारे (कर्जत), बाळासाहेब बाचकर (सोनई), भाऊसाहेब सानप (साई मंदिर सुरक्षा, शिर्डी).

### सोने लाख मोलाचे!

भावाने ९६७२६ रुपये प्रति १० ग्रॅमचा उच्चांक गाठला आहे. यापूर्वी म्हणजेच शुक्रवारी सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याचा भाव ९८१५० रुपये प्रति १० ग्रॅम होता. शुक्रवारी सोन्याच्या किमतीत २० रुपये प्रति १० ग्रॅमची घट नोंदवण्यात आली होती. पीटीआयनुसार, लोकल मार्केटमध्ये सोन्याचा भाव ९९३०० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. गेल्या वर्षी ३१ डिसेंबरपासून आतापर्यंत सोन्याच्या भावात २६ टक्के प्रति १० ग्रॅमची वाढ दिसून आली आहे. डिसेंबरपासून आतापर्यंत सोन्याचा भाव २०८५० रुपये प्रति १० ग्रॅमने वाढला आहे.

**सोन्याचे भाव का वाढत आहेत?**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्कामध्ये ९० दिवसांची स्थगिती दिली आहे. मात्र, ते पूर्णपणे संपवण्यात आलेले नाही. तर चीन आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या व्यापार युद्धामुळे जागतिक चिंता वाढली आहे. त्यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणजेच सोन्याकडे वळत आहेत.

### ख्रिश्चनांच्या सर्वात मोठ्या धर्मगुरूंचे निधन

स्वतःला समर्पित केले होते. त्यांनी गरीब आणि वंचित लोकांची तत्परतेने सेवा केली. जे लोक दुःखी होते, त्यांच्यासाठी त्यांनी आशेची भावना जागृत केली.

मी त्यांच्यासोबतच्या भेटी आठवतो आणि सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या वचनबद्धतेने खूप प्रेरित झालो. भारतातील लोकांविषयी त्यांचे प्रेम नेहमीच जपले जाईल.